I J R S S I S, Issue (IX), Vol. (I), May 2023: 168-171
A Double-Blind Peer Reviewed Journal
OPEN ACCESS
e-ISSN 2347 – 517X
Original Article
Reg. No. : MH-NGP/0000167
INTERNATIONAL JOURNAL OF RESEARCHES IN SOCIAL SCIENCE AND INFORMATION STUDIES
© VMS RESEARCH FOUNDATION www.ijrssis.in

# चंद्रपूर जिल्हयातील राजुरा तालुक्यातील शेतमजुरांचा तुटवट्यामुळे शेतीवर झालेला परिणाम

**राजेंद्र आ. मालेकर**
डॉ. खत्री महाविद्यालय, तुकूम, चंद्रपूर
*Corresponding Author :- rmalekar1990@gmail.com

Communicated : 21.01.2023 | Revision : 28.02.2023 Accepted : 27.03.2023 | Published : 30.05.2023

**सारांश :**

चंद्रपूर जिल्हयातील राजुरा या तालुक्यातील ग्रामीण भागातील लोकांचा प्रमुख व्यवसाय म्हणजे शेती होय परंतु आज हा शेती व्यवसाय करण्याकरिता अनेक प्रकारच्या अडचणी शेतकऱ्यांना येतात त्यातील अत्यंत महत्वाची समस्या म्हणजे शेतीसाठी लागणारे शेतमजूरांचा होणारा तुटवडा होय. याचे कारण म्हणजे ग्रामीण भागातील शेती ही विशिष्ट हंगामातच केली जातात आणि त्याच हंगामात शेतमजुर स्थलांतर होत असतात त्यामूळे शेतकऱ्याला शेतीच्या हंगाम किंवा मशाकत योग्य प्रकारे होवू शकत नाही आणि त्याचा परिणाम शेतीच्या उत्पादनावर होतो.

शेतीची मशागत जर योग्य वेळी योग्य प्रकारे झाली नाही तर शेतीमध्ये येणारे किंवा घेतल्या जाणाऱ्या पीकावर त्याचा परिणाम होत असतो. शेतकऱ्याला अनेक प्रकारच्या समस्या जाणवतात मग त्या नैसर्गिक असो वा मानवनिर्मीत समस्या असे परंतू मरतो शेतकरीच आणि अशा परिस्थितीत जेव्हा मजुराचा स्थलांतर झाले की शेतकरी शेतीची हंगाम बरोबर करू शकत नाही. शेतमजुराच्या समस्या शेतकऱ्यासमोर निर्माण होतात असे शेतमजुराचे अज्ञानपणा, त्यांच्या मजुरीबाबत समस्या, स्थानांतरणच्या समस्या, शेतमजुर व शतकऱ्यामध्ये झालेला पक्षपातपणा, योग्य दर न मिळणे, मजुराच्या सुरक्षेतेच्या समस्या, सरकारी योजने बाबत समस्या इत्यादी प्रकारच्या समस्या जातात परंतू त्यावर काही अश्या प्रकारच्या उपाय सुध्दा करता येतात जसे शेतमजुराला व शेतकऱ्याला प्रथम स्थान द्यावे, औद्योगीक क्षेत्रात योग्यतेनुसार भरती, शेतीसंबंधीत जोडधंदा, सुरक्षेतेच्या सोयी, पीकांवर त्याच ठिकाणी प्रक्रिया, योग्य दर आणि सरकारी योजणाचा प्रत्यक्ष लाभ या काही उपाययोजणा आखल्या तर मजुरांचा तुटवटा भासणार नाही.

ग्रामीण भागातील शेतमजुरांचा शहराकडे स्थलांतरन होण्याचा कल, शेतीचे हंगामी स्वरूप, नियमित स्वरूपात रोजगार उपलब्ध करून देणे आवश्यक आहे.

**मुख्यशब्द** : उत्पादन, शेतमजुर, शहर, स्थलांतर, हंगाम, औद्योगिक पक्षपातपणा, जोडधंदा, तुटवटा, मशागत.

**प्रस्तावना :**

राजुरा तालुक्यातील ग्रामीण भागातील लोकांचा शेती हा प्रमुख व्यवसाय आहेत. परंतु आता त्यांना शेती करणे फार कठीण झाले आहे कारण शेतीसाठी लागणारे साहित्य जरी उपलब्ध असले तरी शेतीमध्ये ती साधणे हाताळण्याकरीता शेतमजुरांची गरज आहे जर शेती करण्याकरीता ग्रामीण भागातील शेतकऱ्यांना त्यांच्या शेतीत काम करण्याकरीता शेतमजुर उपलब्ध नसेल तर तो शेतकरी शेती करू शकत नाही. आणि ग्रामीण भागातील शेतकऱ्यांना तंत्रज्ञानाचा वापर करून शेती करणे परवडत नाही त्याचे अनेक कारणे आहेत. ती कारणे म्हणजे ग्रामीण भागातील शेतकऱ्यांना तंत्रज्ञानाचा वापर करून शेतीकरणे परवडण्यासारखे नाही त्याचा खर्च खुप येतो. तसेच शेतकऱ्यांनाते तंत्र हाताळता येत नाही. त्यामुळे परवडत नाही विशेष म्हणजे ग्रामीण भागातील शेतीची भुधारणा कमी असते त्यामूळे शेतीमध्ये तंत्राचा वापर करणे परवडत नाही भुमिहीत शेतकरी, शेतमजुर आणि छोट्या शेतकऱ्यांच्या समस्या सोडविण्यासाठी आपण तातडीने आणि निर्धारपुर्वक लक्ष दिले नाही आणि दुसरीकडे मोठ्या प्रमाणाम तंत्रज्ञान क्षमतेचा उद्योगप्रधान भारत मनतो परंतु दारिद्र्य, भुकेकंगाल अशी स्थिती आपणास आज दिसून येते.

आजच्या या परिस्थितीत शेतकऱ्यांना शेती करणे कठिण झाले आहे कारण शेती क्षेत्रात काम करायचे म्हटले की शेतात काम करण्याकरीता माणसाची गरज आहे आणि ही माणसं असल्याशिवाय आपण शेती करून शकत नाही शेतीची मशागत करण्यासाठी, शेतात काम करण्यासाठी, शेतकऱ्यांना शेतमजुराची गरज आहे त्याशिवाय शेती करणे कठीण झाले आहे त्याचे कारण म्हणजे शेती ही विशिष्ट

हंगामातच या ग्रामीण भागात करित असतात आणि हे करण्यासाठी शेतमजुराची गरज आहे. चंद्रपूर जिल्ह्यातील राजुरा तालुक्यात लहान लहान खेडी आहेत त्या गावात मोठ्या प्रमाणात शेत मजूर दिसून येते परंतू या भागात ते शेतमजुर कमी भासत आहे. यांचे कारण म्हणजे ते शेतमजुर शहराकडे स्थलांतर होत आहे सोबतच कंपनी किंवा इतर ठिकाणी काम करण्यास जात आहे जरी त्याना मजूरी कमी दिली तरी ते शेतमजुर त्याच्या कडे धाव घेत आहे. याचे कारण म्हणजे शेतात काम करण्याकरीता पूर्ण बाराही महिने त्याना रोजगार मिळत नाही शेती ही विशिष्ट्य कालावधीसाठी (काही महिण्यासाठी) केल्या जातात आणि ग्रामीण भागातील शेती ही कोरडवाहू असल्यामुळे बाराही माहिने शेती नसतात त्यामुळे शेतमजुरांना मजुरी न मिळाल्यामुळे ते शेतमजुर शहराकडे धाव घेतात.

शेतीक्षेत्राचा मुख्य कणा म्हणजे शेतमजुर होय. चांगले बियाणे, भांडवल, खते, जमीन, हवामान, बाजारभाव या सर्व गोष्टीला शेतीसाठी खूप महत्वाच्या आहे. यांत्रिकीकरण किती झाले आहेत किंवा शेतीचे आधुनिकीकरण किती झाले तरी मजुरांशविाय शेती करणे ही एक प्रकारची कल्पनास आहे. ग्रामीण भागात शेतमजुरांच्या संघटना कमी नाही किंवा त्यांच्यात सहसंबध पुरेश्या प्रमाणात नाही. शेतमजुर आणि शेतकरी यांचा संबंध अगदी पारदर्शक आहे. शेतीव्यवसायात शेतमजुर हा अत्यंत महत्वाचा घटक मानला जातो.

शेतमजुराच्या काही महत्वाच्या समस्या त्या समस्यामुळे शेतीच्या उत्पादनावर परिणाम होतो. त्या समस्या पुढील प्रमाणे सांगता येतात.

**१. शेतमजुराचे अज्ञानपणा :–**

ग्रामीण भागातील शेतमजूर अजूनही अज्ञान आहे. शेतीसंबंधीत निर्माण होणाऱ्या समस्या सोडविण्यास व त्यांच्या कुटूबासंबंधीत ज्या समस्या निर्माण होतात त्या समस्येची सोडवणूक करण्यास हा शेतमजुर सक्षम नाही आणि शेतीची कामे करून शेतमजुराला शेतामध्ये जाण्यासाठी वेळ लागतो किंवा मुलांच्या शिक्षणासाठी इतर कामासाठी शेतमजूरांना अडचन निर्माण होतात कारण शेतमजुराला विविध अडचणी जातात ते शिक्षणा अभावी निर्माण होतात. कारण त्या मजुराला जास्त वेळ देता येत नसल्यामुळे शेतीत काम कमी दिवस मिळतात परिणामी त्याना मिळणारी मजूरी देखील कमी मिळतात व नियमीत कामावर न गेल्यामुळे जास्त दिवस काम मिळत नाही. म्हणून त्यांना कमी मजूरी मिळताच त्या कामाकरिता मजूर न मिळाल्यामूळे शेतकऱ्यांच्या उत्पादनावर देखिल परिणाम होतात.

**२. शेतमजुराच्या मजुरीबाबत समस्या :–**

शेतीमध्ये काम करणारे मजूर विखुरलेले जातात विशिष्ट हंगामात शेतीची कामे करावी लागत असतात परंतू सर्वाकडे शेतीची कामे एकाच वेळी (विशिष्ट हंगामात) येत असल्यामुळे शेतमजुराना जिकडे मजुरी जास्त मिळेल त्या ठिकाणी शेतमजुर जातात परिणामी शेतमजुर गेल्यामुळे त्या शेतीतील कामे व्यवस्थीत न झाल्यामुळे शेतकऱ्यांच्या उत्पादनावर परिणाम होत असतो.

**३. शेतमजुरांचे स्थलांतर झाल्यामुळे :–**

सद्यांच्या परिस्थीतीत काम करणारे शेतमजुर हे शहराकडे किंवा उद्योगाकडे काम करण्याकरीता, स्थलांतर होत आहे. यांचे कारण म्हणजे त्याना वर्षातुन फक्त काही महिने मजुरी मिळतात परंतु बाकीचे दिवस खाली राहावे लागतात त्यामुळे त्याना आपल्या कुटूंबासंबंधी निर्माण होणाऱ्या अनेक समस्यांना तोंड द्यावे लागतात. विशेष म्हणजे आर्थिक परिस्थीती नाजूक असल्यामुळे त्याना शहराकडे किंवा एखाद्या उद्योगाकडे कामासाठी जावे लागतात परंतू हे मजूर जेव्हा स्थलांतर करतात तेव्हा

शेतामध्ये काम करणाऱ्या मजूराची त्या हंगामात कमतरता भासतात आणि शेतकऱ्यांना तेव्हा मजुराची गरज असते म्हणुन तेव्हा ती शेतमजुर मिळत नाही. त्यामुळे शेतामध्ये उत्पादन होत नाही. करीता त्याला उत्पादनासाठी अडचणी निर्माण होतात.

**४. शेतमजुर व शेतकऱ्यांमध्ये पक्षपातपणा :–**

ग्रामीण भागामध्ये काम करणारे शेतकरी आणि शेतमजुर यांच्या मध्ये राजकीय दृष्टि कोणातुन निर्माण होणाऱ्या समस्या निर्माण होतात बहुतांश अशा प्रकारच्या समस्या ग्रामीण भागात मोठ्या प्रमाणात निर्माण होतात कारण ग्रामीण भागात पक्षपातामुळे वादविवाद निर्माण होतात आणि हे वादविवाद काही वेळासाठी किंवा दिवसासाठी नसतात तर ते कायमचे निर्माण होतात त्यामुळे असे मजुर दुसऱ्या शेतकऱ्यांच्या कामावर जात नाही तो मजुर खाली राहतो त्या शेतकऱ्यांच्या शेतीमध्ये कामाला जात नाही. त्यामुळे अशा प्रकारच्या समस्या ग्रामीण भागात निर्माण होतात.

**५. शेतकऱ्यांना व शेतमजुराण योग्य दर ना मिळाल्यामुळे :–**

शेतकऱ्यांची शेतामध्ये जी पिके घेतली आहे अशा सर्व पिकांना जर योग्य बाजारभाव जर मिळाला तर शेतमजुराना योग्य दर मिळू शकते याचे कारण म्हणजे शेतकऱ्यांना शेतीची मशागत करून जर विकलेल्या मालातुन जि रक्कम शिल्लक राहीली तर तो चांगल्या प्रकारे मजुरांना मजुरी देवू शकते. परंतु त्याच्या पिकांना योग्य भाव न मिळाल्यामुळे जास्त मजुरी देणे शेतकऱ्याला परवडत नाही. त्यामुळे शेतीची योग्य मशागत होत नाही मजुरां अभावी शेतीत उत्पादन घेणे कठिण झाले आहे.

**६. शेतमजुरांच्या सुरक्षतेचा अभाव :–**

शेतात काम करण्याऱ्या शेतमजुरांच्या सुरक्षतेच्या उपायांच्याबाबत शंका आहे त्यात अनेक प्रकारामुळे मजुरांचे नुकसान होवू शकते जसे विजेमुळे, पाऊसामुळे, जंगली प्राण्यामुळे आणि इतर कारणांमुळे देखिल, शेतीमध्ये शेतकऱ्यांच्या किंवा शेतमजुरांचा मृत्यू देखिल होवू शकतो या सर्व कारणानी शेतावर शेत मजुर न येता शहराकडे धाव घेतो व त्यात त्याना महिण्याप्रमाणे दर महिण्याची एकाच वेळी रक्कम मिळत असते तसेच कारखाण्यात काम करताना सुरक्षतेची पण सोय असते तसी सुविधा शेतात काम करताना नसते म्हणून शेतमजुर शेतात काम न करता बाहेर जावून काम शोधातात.

**७. सरकारच्या विविध प्रकारच्या सुविधा :–**

ग्रामीण भागात आता सरकारच्या विविध प्रकारच्या सुविधा दिल्यामुळे देखिल शेतावरती काम करणारे मजूर शेतीवर न जाता घरीस राहातात जसे ग्रामीण सडक योजना, ग्रामपंचायत रोजगार हमी योजना आणि आता कोरोना मुळे मिळत असलेले सरकारी स्वस्त: धान्याच्या दुकानातून धान्य मिळतात या कारणानी शेतावरची उन्हातान्हात काम करून मिळणारे धान्य त्याना आता मोफत मिळत असल्यामुळे हा शेतमजूर कष्ट करीत नाहीत याचा परिणाम शेतावरती काम करणाऱ्या मजूरांची संख्या कमी झाली व त्याचा परिणाम उत्पादनावर होत आहे.

**शेतमजुराच्या समस्यावरील उपाय :–**

शेतीवर काम करणाऱ्या शेतमजुराच्या तुटवडयामुळे शेतीवर जो काही परिणाम होतो त्या वरील उपाययोजना खालील प्रमाणे सांगता येतात.

१. शेतीवरती काम करताना पाहून शिकलेल्या व्यक्तींना गावातील लोक दूय्यम स्थान दिले जाते. त्याना दुय्यम स्थान न देता प्रथम स्थान दिले तर शेतीकडे पाहण्याचा दृष्टीकोन लोकांचा बदलेल व शेतावर शेतीसंबंधीत शिक्षण घेऊन शेतीत काम करण्याकरीता मजूराची कमतरता भासनार नाही.

२. औद्योगीक क्षेत्रात, कंपनीमध्ये काम करताना प्रत्येक विभागात त्या त्या शिक्षणानुसार काम करणारी व्यक्ती घ्यावी, खाजगी उद्योगात रोजी नुसार कामगार काम करण्याकरीता घेतात त्याना त्या कामाबद्दल पुरेशे ज्ञान नसल्यामुळे अपघात होण्याची शक्यता असते तेव्हा त्या ठिकाणी योग्य व्यक्तीला म्हणजेच कामाबद्दल माहिती असणाऱ्यांना घेण्यात यावे त्यामुळे उर्वरीत व्यक्ती शेतावर काम मन लावून करतील व मजूराची कमतरता वाटनार नाही.

३. शेतात काम करणाऱ्या मजुरांना आणि शेतकऱ्यांना त्या संबंधीत जोडधंदा केल्यामुळे त्याना आर्थिक अडचन भासनार नाही आणि शेत मजुराचे शहराकडे स्थलांतर होणार नाही त्यामुळे शेतमजुराचा तुटवढा भासणार नाही.

४. शेतमजुरांना नैसर्गिक संकट किंवा माणसांनी निर्माण केलेल्या संकटापासून तसेच जंगली प्राण्यापासून सुरक्षा दिल्या तर शेतावर काम करणारे मजूर मन लावून काम करेल व शेतीचे उत्पादन वाढेल.

५. शेतात पिकलेल्या पिकांवर जी काहि प्रक्रिया आहे ती प्रक्रिया शेतकऱ्याला आपल्याच गावी करता यावी जेने करून गावातील मजूरांना गावातच रोजगार मिळेल त्यामुळे मजूरांचे स्थलांतर होणार नाही बाराही महिने मजूरांना काम मिळेल.

६. शेतकऱ्यांना त्यांच्या पिकाला योग्य भाव मिळावा जेनेकरून त्यांना शेतमजूराला जास्त दरात मजूरी दिली तरी शेतकऱ्यांना ते परवडेल.

७. सरकारी योजनांचा प्रत्यक्ष व सरळ लाभ शेतकऱ्यांना मिळेल अशी यंत्रणा तयार करावी जेनेकरून त्याचा संपूर्ण लाभ घेवून शेतकऱ्यांला फायदा होईल.

**निष्कर्ष :—**

वरील विषयाच्या अभ्यास केला असता असे लक्षात येते की, पर्जन्य धारित शेती अन्नधान्य उत्पादनात वाढ करण्यासाठी, शेतीची उत्पादकाता, मशागत योग्य वेळी योग्य प्रमाणात होण्यासाठी शेतीत काम करण्यासाठी शेतमजुराची गरज आहे कारण याला शेतमजूरा अभावी शेती करणे कठिण आहे आणि लहान शेतकऱ्यांना नविन तंत्रज्ञानाचा वापर करून शेती करणे परवडणार नाही. त्याची आर्थिक परिस्थिती इतकी चांगली नसते. म्हणून शेतमजुराची गरज आहे त्यांच्या अभावी शेती करणे कठीण तर आहेच परंतू उत्पादन देखिल घेणे परवडत नाही.

**संदर्भ :**

https://www.agrowon.com.

भारतीय अर्थशास्त्र — डॉ. जी. एन. झामरे, पिंपळापूरे ॲन्ड क. पब्लिशर्स (नागपूर)

योजना ६ वर्ष ३८ अंक आगष्ट २००६.

ग्रामगीता

अध्याय १३ ग्रामनिर्माण कला वं. राष्ट्रसंत श्री तुकडोजी महाराज

शेतकऱ्यांच्या समस्या व उपाय (मासिक) प्रा. डॉ. मुकुंद गायकवाड

दैनिक लोकमत, लोकसत्ता या वर्तमान पत्रातील विविध लेख.